श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मार्च २०२२ | वर्ष - १०, अंक - ४ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | विशेषांक, पाने १२

## श्रीशिवजयंती सोहळा, श्रीक्षेत्र डेरवण

### शिवराज्याभिषेक शक ३४८




श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीक्षेत्र डेरवण आयोजित श्रीशिवजयंती सोहळा फाल्गुन वद्य तृतीया, शक १९४३, शिवराज्याभिषेक शक ३४८, सोमवार, दि. २१ मार्च २०२२ रोजी श्रीशिवसमर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षाप्रमाणेच अत्यंत उत्साहाने साजरा झाला. सकाळी ९.०० वाजता सुरू झालेल्या या सोहळ्याचे अध्यक्षस्थान ख्यातनाम लेखिका, व्याख्यात्या, निवेदिका मा. धनश्रीताई लेले यांनी भूषविले तर प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. चित्रलेखा पुरंदरे या होत्या. मा. शशिकांतभाऊ सुतार आणि मा. प्रा. सचिन कानिटकर यांनीही या वेळी उपस्थित राहून आपले विचार व्यक्त केले.

ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यावर ध्वजप्रार्थना-पठण झाले आणि वे. मू. मंदार फडकेगुरुजी, वे. मू. मिलिंद बोरकरगुरुजी आणि ब्रह्मवृंदाने शांतिसूक्त पठण केले. सभेच्या सूत्रसंचालिका श्रीमती शरयू यशवंतराव यांनी प्रास्ताविक करून सभेच्या अध्यक्षा आणि प्रमुख वक्त्या यांचा परिचय करून दिला आणि ट्रस्टतर्फे श्री. विकासराव वालावलकर यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. अन्य वक्ते मा. शशिकांतभाऊ सुतार, प्रा. सचिन कानिटकर, तसेच डेरवणच्या सरपंच मा. श्रीमती अक्षता मुंढेकर आणि अन्य मान्यवरांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

ट्रस्टतर्फे प्रतिवर्षी आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या काही समाजसेवकांचा सत्कार करण्यात येतो. आपल्या परिसरातील गोरगरीब रुग्णांना डेरवण रुग्णालयातील आरोग्यसेवेचा लाभ घेता यावा म्हणून त्यांना साहाय्य करणारे श्री. सुधीर नकाशे (जि.प. सदस्य, सिंधुदुर्ग), श्रीमती मृणाल कदम (माजी सरपंच, वेल्हे) आणि श्रीमती तेजश्री धनावडे (अंगणवाडी सेविका, धामापूर, ता. चिपळूण) यांचा अध्यक्षांच्या हस्ते चांदीचा प्याला आणि पुष्पगुच्छ



*प्रमुख पाहुण्या मा. चित्रलेखा पुरंदरे आणि अध्यक्षा मा. धनश्रीताई लेले यांचे सभास्थानी आगमन*



*श्रीसहजानंदसरस्वती महाराज आणि भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहताना मा. धनश्रीताई लेले आणि मा. चित्रलेखा पुरंदरे*

देऊन सत्कार करण्यात आला. सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून माध्यमिक शाळेत पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या डेरवण परिसरातील मुलींना प्रोत्साहन म्हणून दरवर्षी मनगटी घड्याळे बक्षीस दिली जातात. या वर्षी जि. प. शाळा, डेरवण नं. १ मधील नऊ विद्यार्थिनी आणि जि. प. शाळा, हडकणीमधील चार विद्यार्थिनींना अध्यक्षांच्या हस्ते ही बक्षिसे देण्यात आली. यानंतर सभेच्या मुख्य कार्यक्रमाला, माननीय वक्त्यांच्या व्याख्यानांना प्रारंभ झाला.

श्री. शशिकांतभाऊ सुतार यांनी सर्वप्रथम आपले विचार व्यक्त केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''पिढ्यानपिढ्या लोकांना राष्ट्रभक्तीची जाण राहावी, सर्वस्वाचे राष्ट्रासाठी दान करण्याची प्रेरणा मिळावी, प्रेमाचा, स्वार्थत्यागाचा मार्ग सापडावा म्हणून सद्गुरू श्रीसहजानंदस्वामी महाराजांनी आपल्या बालपणापासूनच ध्यास घेऊन, या अवतारी पुरुषाचे, शिवशंभूंच्या अवताराचे, श्रीशिव छत्रपतींचे हे स्मारक उभे केले आहे. नियोजनबद्ध काम हे सद्गुरूंचे वैशिष्ट्य होते. आजही ती परंपरा जपलेली आहे. शिवसमर्थ गडात दररोज हजारो विद्यार्थी, नागरिक येत असतात. त्यांच्या मनात देशभक्तीची, अस्मितेची ज्योत उजळावी म्हणून येथे हे स्मारक उभारलेले आहे. ५ मे १९८१ रोजी शिवसमर्थ मंदिराचे उद्घाटन झाले. मग शिवचरित्रातील एकएक प्रसंग साकार झाला. जिचा अभिमान बाळगावा, जिची जोपासना करावी, जिचा वारसा जपावा अशी आपली थोर संस्कृती साकार झाली आहे. गेली ४१ वर्षे शिवजयंती येथे साजरी होत आहे. स्वयंसेवकांची तिसरी, चौथी पिढी आता येथे येत आहे. साऱ्या जगाला, नव्या विचारांचा प्रारंभ करणारा एक युगपुरुष, एक राष्ट्रपुरुष अशी छत्रपती शिवाजीमहाराजांची ओळख आहे. त्यांनी डोंगरदऱ्यातील मावळ्यांमध्ये स्वराज्याची, स्वत्वाची जाणीव निर्माण केल्याने, बलाढ्य शत्रूशी मावळे गनिमी काव्याने लढले. स्वराज्याची स्थापना ही ऐतिहासिक घटना आहेच, परंतु नव्या विचारयुगाचा तो प्रारंभ ठरला आहे. सतराव्या शतकात



*ध्वजपूजन करताना प्रमुख विश्वस्त मा. विकासराव वालावलकर*



*ध्वजप्रार्थना पठण*



सूत्रसंचालिका सौ. शरयू यशवंतराव



शांतिसूक्त पठण

छत्रपती शिवरायांनी लोकशाहीला अभिप्रेत असे कल्याणकारी राज्याचे अधिष्ठान राजेशाहीला दिले. रयतेला परकीय सत्तेच्या आणि वतनदारीच्या गुलामगिरीतून मुक्त केले. छत्रपती शिवरायांनी आपल्या बुद्धिसामर्थ्याने शत्रूला नामोहरम केले. दिल्लीपतींना तीस वर्षे झुंजत ठेवले. निजामशाही, आदिलशाही यांच्याशीही झुंज घेऊन स्वराज्य निर्माण केले. कोणाला जहागिरी तोडून दिली नाही. दुष्टांचा काळ, सज्जनांचा कनवाळू, रयतेला पोटच्या मुलाप्रमाणे वागवणारा, सदैव सावध आणि उद्योगी, स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा यांचा अभिमानी आणि संगोपन करणारा असा हा आधुनिक विचारांचा राजा होता. पठाणांच्या जुलुमजबरदस्तीपुढे हिंदू समाज भयभीत होता. त्याला कोणी तारणहार नव्हता. छत्रपती शिवाजी महाराजांनी क्रांती केल्यामुळे इस्लामी सत्ता नामोहरम झाल्या. शिवरायांची ध्येयधोरणे, त्यांचे रणांगणातील कौशल्य, त्यांचे लष्करी डावपेच, प्रसंगी माघार तर प्रसंगी आक्रमण, आपले राज्य कल्याणकारी व्हावे यासाठीची त्यांची धडपड यामुळे समकालिनांना त्यांचे आयुष्य हा एक चमत्कारच वाटायचा. पण आजही पिढ्यान पिढ्या त्यांच्या चारित्राने भारावून गेलेल्या आहेत.

शिवरायांचे वर्तन हे न्यायाचे, नीतीचे आणि धर्मपरायणाचे होते. अनेक लढायात विजय संपादन करणे, मैदानी-डोंगरी अथवा सागरी किल्ले बांधणे, सैन्य आणि आरमार निर्मिती, नवीन कायदे करणे, स्वभाषेला उत्तेजन, कवींना आश्रय, नवी शहरे वसवणे, स्वधर्माचे रक्षण आणि संगोपन हे लोकोत्तर कार्य शिवरायांनी केले. शिवरायांची कोणाशीही तुलना होऊ शकत नाही. छत्रपती शिवाजीमहाराजांनी अनेक कर्तबगार, पराक्रमी आणि बुद्धिमान माणसे आपल्याभोवती गोळा केली. समर्थांच्या भाषेत सांगायचे तर ‘बहुत जनांचा आधारू । श्रीमान योगी ।।’ छत्रपती शिवाजीमहाराज अंतरंगी वैराग्यशील ऋषी होते. प्राचीन हिंदू राजनीतीमध्ये वर्णन केलेल्या आदर्श राजपदाला ते पोहोचलेले होते.



मा. अध्यक्षा धनश्रीताई लेले यांचा सत्कार करताना
मा. विकासराव वालावलकर



प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. चित्रलेखा पुरंदरे यांचा सत्कार करताना
मा. विकासराव वालावलकर



*श्री. सुधीर नकाशे यांचा मा. अध्यक्षांच्या हस्ते सत्कार*

कोणताही राजा प्रजेच्या पाठबळाशिवाय राज्य करू शकत नाही. शिवरायांनी राष्ट्रभावनेने समाजाला एकसंध बनविले. प्रजेची अपेक्षा एवढीच असते की आपला उदरनिर्वाह शांतपणे व्हावा, आपल्या श्रमाचा योग्य मोबदला मिळावा, शत्रूपासून रक्षण व्हावे. थोडक्यात, कायदा आणि सुव्यवस्था असावी. या अपेक्षा शिवरायांनी पूर्ण केल्या.

लोकशाहीत अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण, आरोग्य या मूलभूत गरजा भागणे महत्त्वाचे आहे. श्री सहजानंदसरस्वती महाराजांनी या गरजा भागविण्यासाठी डेरवणसारख्या आडवळणी गावात कार्य केले. हे काम सच्चाई, सेवावृत्ती आणि देवा-धर्माचे काम आहे. सत्य उजेडात यायला वेळ लागतो. पण डेरवणच्या कामाची दखल आज ना उद्या जगाला घ्यावीच लागेल. आपण या साऱ्याचे साक्षीदार आहोत याचा आपल्याला आनंद आणि अभिमान आहे.''

शशिकांतभाऊंनंतर प्रा. सचिन कानिटकर बोलायला उठले. काही पूर्वस्मृतींना उजाळा देऊन ते म्हणाले, ''गतवर्षी शिवजयंतीला करोनाचे सावट असूनही मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहिले. या वर्षीही आठ हजार फक्त खेळाडूच आले आहेत. माळरानावर तुरळक दोन-चार घरे असणाऱ्या या गावात आता घरे बांधायला जागा शिल्लक राहिलेली नाही ही सगळी सद्गुरूंची कृपा आहे. पोषक आहाराचे संस्थेचे प्रकल्प आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहेत. परदेशातून येथे डॉक्टर्स येत आहेत. हे सर्व पाहिले म्हणजे, चमत्कारावर माझा विश्वास नाही असे म्हणणाऱ्यांची बोलतीच बंद होईल. महाराजांनी शिवसृष्टी उभी केली. शिवजयंती सुरू केली आणि त्यातून मिळालेल्या ऊर्जेतून 'तयाचा वेलू गेला गगनावेरी' असे झालेले आहे!



*श्री. शशिकांतभाऊ सुतार –*
*कोणताही राजा प्रजेच्या पाठबळाशिवाय राज्य करू शकत नाही.*

या वर्षीची शिवजयंती वेगळी आहे कारण आज अध्यक्ष आणि प्रमुख वक्त्या या दोन्ही महिला आहेत. त्यामुळे मलाही आज 'शिवकालीन स्त्रिया' या विषयावर बोलायचे आहे. या विषयावर बोलताना जिजाऊमाता यांच्याशिवाय पान हालणार नाही. भिडेगुरुजी म्हणतात की सर्वच विद्यापीठांना मातोश्री जिजाबाईंचे नाव दिले पाहिजे म्हणजे त्यातून छत्रपती शिवाजीमहाराज निर्माण होतील. ते विद्यापीठ नेमके कसे होते?

आम्ही डेरवणला येताना वाटेत संभाजीमहाराजांना जेथे पकडले त्या संगमेश्वर येथील स्थानाचे दर्शन घेऊन येतो. हा बलिदान मास आहे. फाल्गुन अमावास्येला त्यांचे बलिदान झाले. तेथे मालोजीबाबा घोरपडे म्हणजे संताजी घोरपडे यांचे वडील, यांनी आपला देह धारातीर्थी ठेवलेला आहे. त्यामुळे ते पावन तीर्थक्षेत्र आहे. त्याआधी वडगाव येथे धनाजी जाधवांच्या समाधीचे दर्शन घेऊन येतो. धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांनी महाराणी ताराराणींच्या कालात स्वराज्य जिवंत ठेवले. औरंगझेबाच्या छावणीचे कळस कापून आणणारी ही मंडळी!

घोरपडे हे मूळचे भोसलेच आहेत. घोरपडीच्या साहाय्याने पराक्रम केला म्हणून त्यांना घोरपडे नाव प्राप्त झाले. हे स्वराज्य निर्माण केले ते भोसले आणि जाधवांनी. छत्रपती शिवाजीमहाराज हे शहाजीराजे भोसले आणि जिजाऊबाई या जाधव यांचे पुत्र!

देवगिरीच्या यादवांचे राज्य गेले. देवगिरीचे दौलताबाद झाले. यादव सिंदखेडला राहायला आले. त्यांचे नाव जाधव झाले. या जाधव घराण्यात जिजाबाई आईसाहेब जन्मल्या. आणि इकडे भोसल्यांच्या घरात शहाजीराजे! पाचव्या वर्षीच शहाजीराजांना सरदारकी प्राप्त झाली. शहाजीराजे आणि जिजाऊ आईसाहेब यांचा विवाह मोठ्या थाटामाटात झाला. अशी दंतकथा आहे की रंगपंचमीच्या दिवशी दोघं



*प्रा. सचिन कानिटकर*



*सातवी उत्तीर्ण मुलींना उत्तेजनार्थ बक्षिसे*

रंग खेळत असताना सिंदखेडच्या लखुजी जाधव यांनी पाहिलं आणि ते म्हणाले की जोडा लक्ष्मी-नारायणासारखा दिसतो! मालोजीराजांनी हा शब्द लावून धरला. प्रत्यक्ष लग्न झाले तेव्हा मालोजीराजे हयात नव्हते. ही घटना इतिहासातील फार महत्त्वाची आहे. जिजाबाई आईसाहेब बाल शिवाजींना घेऊन महाराष्ट्रात राहायला आल्या, कारण स्वराज्याची सगळी मुहूर्तमेढ शहाजीराजांच्या डोक्यात होती. अतिशय स्वतंत्र विचारांच्या शहाजीराजांना साथ मिळाली आहे ती जिने सुलतानशाही म्हणजे काय हे जवळून अनुभवले आहे अशा जिजाबाई आईसाहेब यांची!

एका राखी पौर्णिमेच्या दिवशी लखुजीराव, त्यांचे पुत्र रघुजी आणि नासरोजी, नातू यशवंतराव असे चौघे जण मोगलांच्या चाकरीत होते ते निजामशाहीत येण्यासाठी दौलताबादच्या किल्ल्यावर गेले. बादशहाला मुजरा करण्यासाठी हे गेले असता समोरून बादशहा निघून गेला! काहीतरी बिनसलं आहे हे लक्षात येण्याच्या आधीच त्यांच्याच पूर्वजांच्या त्या राजदरबारात चौघांचेही मुडदे पाडण्यात आले. हा दाह जिजाबाई आईसाहेब यांनी अनुभवला आहे. आपणच येथले राजे होतो आणि आज आपली अशी अवस्था झाली. याविरुद्ध काहीतरी केले पाहिजे ही ठिणगी लहानपणापासून जिजाबाई आईसाहेब यांच्या मनात होती. तशीच संकल्पना शहाजीराजांच्या मनातही होती. आणि म्हणून शहाजीराजांनी स्वराज्य स्थापनेचे तीन प्रयत्न केले. त्यातील शेवटचा प्रयत्न आपण पाहू. त्या वेळी जिजाबाई आईसाहेब यांनी दाखविलेले सामंजस्य सर्वांनी, विशेषत: महिलांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे. एकदा एका हत्तीवरून भोसल्यांचे आणि जाधवांचे युद्ध झाले. आणि शहाजीराजे यांचे चुलतभाऊ संभाजी भोसले यांच्या हातून जिजाबाई आईसाहेब यांचे भाऊ दत्ताजी मारले गेले. याचा बदला म्हणून लखुजीरावांनी संभाजीरावांना मारले. शहाजीराजांच्या, जावयांच्या, दंडावर वार पडला. ते बेशुद्ध पडले. हे सगळे रणकंदन खंडागळ्यांच्या हत्तीवरून झाले. एवढा वैरभाव निर्माण झाल्यावर भोसल्यांच्या घरात नांदायला आलेल्या जिजाबाई आईसाहेब यांच्या मनाची काय अवस्था झाली असेल याची कल्पना करा. आपल्या पहिल्या पुत्राचे नाव त्यांनी आपल्या दिराचे स्मरण म्हणून संभाजी ठेवले. या बदल्यात त्यांनी एकच मागणे शहाजीराजांजवळ केले असेल, की आता आपापसात वैर नको. एक झाल्याशिवाय आपण लढू शकणार नाही. हा जिजाबाई आईसाहेब यांचा त्याग लक्षात ठेवण्यासारखा आहे.

मोगल आणि आदिलशहा यांनी निजामशाही संपवायचे ठरविल्यावर शहाजीराजांनी जीवधन नावाच्या गडावर निजामशहाचा एक छोटा मुलगा होता त्याला मांडीवर घेऊन निजामशाही संपली नाही असे घोषित केले आणि ते राजे म्हणून कारभार बघू लगले. मोगल आणि आदिलशहा यांच्या संयुक्त हल्ल्यात ते पराभूत झाले. शहाजहान, आदिलशाह आणि त्यांच्यात करार झाला. त्यात असे ठरले की शहाजीराजांनी कधीही महाराष्ट्रात यायचे नाही. म्हणून ते कर्नाटकात बंगळूरला गौरीविलास महालात राजाच्या थाटात राहू लागले. आणि जिजाबाई आईसाहेब शहाजींचे स्वराज्याचे स्वप्न आठ वर्षांच्या शिवाजीमहाराजांकरवी पूर्ण करण्यासाठी; शत्रूने स्मशान करून टाकलेल्या पुण्यात येतात आणि सोन्याचा नांगर या भूमीत घालतात! त्यांनी ग्वाही दिली की शेतकऱ्यांनो या, हे पुणे वसवा, आता तुमचा राजा तुमच्या रक्षणासाठी आला आहे! दादोजी कोंडदेव त्या वेळी सिंहगडाचे सरहवालदार आहेत. अशा रीतीने स्वराज्याची सुरुवात झाली.

छत्रपती शिवाजीमहाराजांनी तोरणा घेतल्यावर काही दिवसांनी शहाजीराजांनी त्यांना बंगळूरला बोलावून घेतले आणि तेथे त्यांचे सोयराबाईंबरोबर दुसरे लग्न लावून दिले. त्याच दरम्यान कधीतरी छोट्या शिवबांना विजापूरला आदिलशहाचा दरबार दाखवायला

नेले आहे. त्याप्रसंगावर कवी दुर्गाप्रसाद तिवारी यांची अप्रतिम कविता आहे. त्या कवितेतून जिजाबाई आईसाहेब यांनी छत्रपती शिवाजीमहाराजांवर केलेले अत्यंत उत्तम संस्कार दिसतात.

प्रसंग बादशहाच्या दरबारातील आहे. काही समारंभ आहे आणि बादशहा मुजरा करायला येणाऱ्यांना पोशाख देत आहे. पण शिवाजीमहाराजांनी मुजरा केला नाही. आजूबाजूचे संतापले. शहाजीराजे चिंतेत आहेत कारण काही होऊ शकते! घरी आल्यावर दरबारात काय झाले ते शिवबा आईला सांगताहेत. आपण का मुजरा केला नाही हे सांगताना बाल शिवाजी म्हणतात, 'होतात देउळें नष्ट, होतात देवता भ्रष्ट । धेनु ब्राह्मण ओरडती, धर्मावरी संकष्ट । न्याय नीति उरली नाही, सारेच भोगिती कष्ट । हा घोर मांडिला ज्यांनी । त्यांचिया पुढे जावोनी । देशाभिमान सोडोनी । प्रेमाच्या मंगल माते! लववेना हें शिर मातें! '...''

कवी तिवारींची संपूर्ण कविता आपल्या जोषपूर्ण शैलीत उद्धृत करून कानिटकरसरांनी श्रोत्यांना ठासून सांगितले की शिवबांवर हे संस्कार जिजाबाई आईसाहेबांच्या विद्यापीठात झाले! या प्रशिक्षणाचा परिणाम कसा झाला होता त्याचे एक उदाहरण सांगतो. दि. २४ एप्रिल १६७५ला इस्ट इंडिया कंपनीचा एक डॉक्टर जॉन फ्रायर मुंबईहून जुन्नरला निघाला होता. वाटेत कल्याणला शिवाजीमहाराजांचे राज्य होते. फ्रायरसोबत २५-३० लोक होते. जकात अधिकाऱ्याने त्याची राहण्याची व्यवस्था करण्यास एका हवालदाराला सांगितले. हवालदाराने त्याची राहण्याची व्यवस्था एका मशिदीत केली. त्या डॉक्टरने असे निरीक्षण नोंदविले आहे की या शहरात बऱ्याच मशिदी आहेत. त्यातील मुल्लांचे गलेलठ्ठ पगार छत्रपती शिवाजीमहाराजांनी बंद करून मशिदींची धान्य साठविण्याची गुदामे केली आहेत!

शिवाजीराजे पन्हाळ्यात अडकले तेव्हा, सोडवायला गेलेले नेताजी पालकर मार खाऊन परत आले तेव्हा जिजाबाई आईसाहेब, 'तुम्हाला जमत नसेल तर मी जाते!' असे म्हणून तलवार घेऊन उठल्या होत्या! जे स्वप्न पतीसमवेत पाहिले ते पूर्ण झालेले पाहून, रायगडावरचा राज्याभिषेक पाहून मग आईसाहेबांनी डोळे मिटले.

दुसरे उदाहरण, संभाजीमहाराजांचे राज्य मोंगलानी वेढलेले आहे, अंतर्गत कलह मोठ्या प्रमाणावर आहे, त्या वेळी जिजाऊंचा वारसा येसुबाईंकडे आला. हा सगळा परिसर त्यांच्या माहेरचा आहे. त्या संभाजीमहाराजांच्या पाठीशी ठाम उभ्या आहेत. निम्मा वर्ग नाराज आहे. संभाजीमहाराजांनी अण्णाजी दत्तोंना हत्तीच्या पायी दिले आहे. मोरोपंताना तशीच शिक्षा केली आहे. बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद यांना हत्तीच्या पायी दिले आहे, त्यांच्यापुढे पर्याय नव्हता. अंतर्गत शत्रूंना संपविल्याशिवाय बाहेरच्या शत्रूसोबत लढता येणार नव्हते. बाहेर औरंगझेब होता! त्याने सर्व बाजूंनी सर्वांना संभाजी महाराजांविरुद्ध उठवले होते. सर्व आघाड्यांवर संभाजीराजांना लढायला लागत होते. आणि त्यावेळी घर, राज्य सांभाळण्याचे काम महाराणी येसुबाईंनी केलं! प्रसंगी शीघ्रकोपी संभाजीराजांनासुद्धा सुनावण्याची ताकत या माउलीत होती. बाळाजी आवजींना मारलं त्या वेळी त्या म्हणाल्या, 'बाळाजी आवजींना उगीच मारलं महाराजांनी! त्यांच्यापाशी थोरल्या महाराजांचे मन होते!' मन होतं म्हणजे काय? तर ते छत्रपतींचे चिटणीस असल्याने त्यांचे मनोव्यापार त्यांना जवळून अवगत होते. संभाजीराजांनीही येसुबाईंजवळ आपली चूक झाल्याचे मान्य केले.

येसुबाईंना संभाजीराजांनी शिक्का करून दिला होता. ते बाहेर असताना येथील कारभार कोण पाहणार? म्हणून 'सखी राज्ञी भवती ।' असा तो शिक्का करून दिला होता. म्हणजे त्यांची आज्ञा ही संभाजीराजांची आज्ञा मानली जायची, एवढे मोठेपण त्यांना राजांनी दिले होते!

औरंगझेबाने तीनतीनशे वर्षांची परंपरा असलेली आदिलशाही, कुतुबशाही संपविली, पण त्याला नुकतेच स्थापन झालेले मराठी साम्राज्य संपवता येत नव्हते! संभाजीमहाराज संगमेश्वरला कैद झाल्यावर रायगडाला झुल्फिकारखानाचा वेढा पडला. त्यावेळी येसुबाईंनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. त्यांनी राजाराममहाराजांना दक्षिणेत बायकामुलांसह निघून जाण्याचा सल्ला दिला. जिंजीपर्यंत छत्रपती शिवाजीमहाराजांनी मुलुख घेऊन ठेवलेला होता. तिकडे त्यांना जायला सांगितले. का? तर आदिलशाही विजापुरात कोंडली जाऊन संपली. कुतुबशाही गोवळकोंड्यात तशीच संपली. 'मी आणि शाहू येथे रायगडावर राहतो. त्यामुळे औरंगझेब येथे गुंतून राहील. वेढा पडण्याच्या आत तुम्ही निसटून जा, म्हणजे दुसरे केंद्र तयार होईल!' या मसलतीला 'थोरली मसलत' म्हणतात. या मसलतीमुळे हिंदवी स्वराज्य जिवंत राहिले. रायगड पडल्यावर त्या मोगलांच्या कैदेत गेल्या, मात्र स्वराज्य लढतच राहिले, हे महाराणी येसुबाईंचे वरदान!

त्यानंतर ताराराणी बाईसाहेब! औरंगझेब जिवंत असतानाच छत्रपती शिवाजीमहाराज गेले, त्यानंतर नऊ वर्षांनी संभाजीमहाराज गेले आणि दहा वर्षांनी राजाराममहाराजही गेले! त्या वेळी त्यांच्याशी लढण्यासाठी राज्याची सर्व सूत्रे ताराराणींनी हाती घेतली आहेत. ताराराणी सरसेनापती हंबीरराव मोहिते यांची कन्या आहे. तेच रक्त अंगात आहे. सुरुवातीच्या कठीण काळात एकदा त्यांनी तहाची बोलणी करण्याचा प्रस्ताव मांडला. पण त्या वेळी औरंगझेबाला आपले एवढ्या वर्षांचे स्वप्न साकार होण्याची वेळ जवळ आली आहे असे वाटले आणि त्याने तो प्रस्ताव नाकारला. मग सात वर्षे तिने प्रखर प्रतिकार केला आणि मग थकलेल्या औरंगझेबानेच तहाचा प्रस्ताव पुढे केला! त्या वेळी तिने उत्तर दिले की एकतर तू

तरी राहशील नाहीतर मी तरी राहीन! आणि औरंगझेब संपला. हिंदवी स्वराज्य राहिले ते ताराराणींमुळे. तीन पिढ्यातील तीन स्त्रियांची आठवण आज मला काढता आली कारण आजचे व्यासपीठ हे स्त्रियांचे आहे!''

प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. चित्रलेखा पुरंदरे यांनी डेरवण येथे सुरू असलेल्या कार्याविषयी आदर व्यक्त करीतच आपल्या भाषणाची सुरुवात केली. त्या म्हणाल्या, ''कालपासून आम्ही येथे जे पाहात आहोत त्यावरून असे वाटत आहे की आम्ही एका अद्भूत जगात वावरत आहोत. त्याचे वर्णन करायला शब्द अपुरे आहेत. माझे असे भाग्य आहे की अशा पवित्र क्षेत्री, अशा पावन सोहळ्याला मला उपस्थित राहता येत आहे. मी या डेरवणला तीर्थक्षेत्रच म्हणते. तुलना म्हणून नव्हे पण आळंदी, देहू, शिवनेरी, रायगड ही देखील तीर्थक्षेत्रंच आहेत. डेरवणही त्याच पंक्तीतले आहे. श्रीसहजानंदमहाराजांनी १९६९ मध्ये समाधिमंदिराची उभारणी केली. १९७६ मध्ये श्रीसीतारामबुवा वालावलकर ट्रस्टची स्थापना झाली. १९८१ मध्ये शिवसृष्टीची उभारणी झाली आणि या तीर्थक्षेत्राची पूर्तता झाली. पुढे काय झाले ते आपण सर्व जाणताच. एखादी संस्था, कार्य सुरू करणे सोपे असते. पण त्याच तत्त्वावर ती पुढे सुरू ठेवणे अवघड असते. या ट्रस्टला आता पन्नासपेक्षा जास्त वर्षे झाली आहेत. सुविचाराच्या, प्रामाणिक भावनेच्या पायावर उभे असलेले हे कार्य वर्षानुवर्षे नव्हे तर हजारो वर्षे टिकून राहील ही खात्री आणि शुभेच्छा! आज युगपुरुष, युगधुरंधर, स्वराज्याचे युग निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवाजीमहाराजांची जयंती. त्या छत्रपती शिवाजीराजे शहाजीराजे भोसले यांना माझा मनोभावे मुजरा!

एक वैयक्तिक सांगते की छत्रपती शिवाजीमहाराजांचे नाव घेतले की माझ्या मनात माझ्या दिवंगत श्वशुरांचे बाबासाहेब पुरंदऱ्यांचे स्मरण होते. शिवाजीमहाराजांचे कार्य, त्यांचे शौर्य, त्यांचे जीवीत या एकाच विषयावर त्यांनी सगळे साहित्यप्रकार हाताळले आहेत. शिवचरित्र लक्षलक्ष मराठी मनाच्या कोंदणात विराजमान करण्यासाठी त्यांनी अपार कष्ट केले. लाखभर किलोमिटर प्रवास करून साधने गोळा करून त्यांनी एक हजार पृष्ठांचे राजा शिवछत्रपती हे चरित्र लिहिले. 'जाणता राजा' ही कलाकृती निर्माण केली. त्यांना माझा प्रणाम!

इतिहास हा अत्तरातून, गुलाबपाण्यातून नाही तर रक्ताच्या, घामाच्या थेंबातून निर्माण होतो. छत्रपती शिवाजीमहाराजांचा इतिहास हा असाच आहे. वेडी माणसे इतिहास निर्माण करतात. मला वाटते डेरवणची माणसे अशीच ध्येयाने वेडी झालेली आहेत! धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिलेले आहे. शिवजयंतीचा सोहळा हा खऱ्या अर्थाने येथे साजरा होताना मला दिसतो आहे! महाराजांचे कार्य हे अनुकरणातून पुढे जात आहे असे मला वाटले. शिवजयंती म्हणजे रस्ते अडवून काढलेल्या मोठ्या मिरवणुका आणि अर्थहीन गाण्यांवर नाचणे चाललेले असते. डेरवणच्या शिवजयंतीचे सर्वत्र अनुकरण व्हायला हवे. हे सगळीकडे पसरावे अशी माझी इच्छा आहे.

एखाद्या देदीप्यमान हिऱ्याला असावेत तसे महाराजांच्या जीवनाला अनेक पैलू आहेत. त्यांची युद्धनीती, समयसूचकता, मुत्सद्दीपणा, न्यायनिष्ठूरपणा, कर्तव्यदक्षता, गोरगरिबांविषयीची तळमळ, माणसांची उत्तम पारख, कुशल नेतृत्व यातून शिवचरित्र तयार झाले आहे. आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातही शिवचरित्रातून स्फूर्ती मिळते. आजच्या तरुणांनी हे सगळे अभ्यासले पाहिजे. छत्रपती शिवाजीमहाराज हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रांतिकारक योद्धा होते. त्यांचा दरारा सह्याद्री, सातपुड्याच्या खोऱ्यातच नव्हे तर समुद्रावरही होता. त्यांचे नेतृत्व बहुआयामी होते. त्यांचे हेरखाते अप्रतिम होते.

त्यांनी फक्त दोन लढायात शत्रूपेक्षा जास्त सैन्य वापरले. बाकी सर्व लढायात शत्रूसैन्यापेक्षा संख्येने कमी असूनही त्यांनी पंचाणव टक्के लढाया जिंकल्या. याला कारण गनिमी कावा आणि मावळ्यांची निष्ठा! केवळ हजार मावळ्यांनिशी त्यांनी स्वराज्याच्या कामाला प्रारंभ केला. अफजलखान आला त्या वेळी त्याचे सैन्य होते बत्तीस हजार आणि महाराजांचे होते सतरा हजार! शाईस्तेखान आला तेव्हा त्याचे सैन्य होते एक लाख तीस हजार! महाराज त्याच्यावर हल्ला करायला गेले तेव्हा त्यांच्याजवळ फक्त पाचशे मावळे होते. आपणाला हा चमत्कार वाटतो पण हा लष्करी चमत्कार आहे! याचा अभ्यास व्हायला हवा! कारण याचा गाभा आहे राष्ट्रीय चारित्र्य!

त्यांच्या प्रत्येक सैनिकाच्या मनात राज्याबद्दल आणि राजाबद्दल अतीव प्रेम आहे. म्हणूनच त्यांना यश मिळाले. जेव्हा आपण समुद्रात पाच मैलसुद्धा आत जात नव्हतो, तेव्हा महाराजांच्या आरमाराने मस्कतला जाऊन भगवा झेंडा रोवला आहे! महाराजांनी जेवढे राज्य जिंकले तेवढे मजबूत केले. याचे कारण असे की जो प्रदेश जिंकायचा त्याचे ते बारीकसारीक बाबतीत निरीक्षण करायचे. 'प्लॅनिंग'- योजना हे महाराजांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य. आग्र्याला जातानाच त्यांनी सर्व बाबींचा विचार करून ठेवला होता. एकच गोष्ट योजनेशिवाय झाली ती म्हणजे महाराजांचा अकाली मृत्यू! पोर्तुगिजांनी महाराजांची तुलना ज्युलिअस सिझर आणि नेपोलियनशी केलेली आहे. नेपोलियनवर आत्तापर्यंत सत्तावीस हजार पुस्तके आहेत. महाराजांवर सत्तावीस हजार पाने लिहून झाली नसतील. तरुण पिढीने स्फूर्ती घेऊन हे काम करणे आवश्यक आहे. महाराजांचा शत्रू औरंगझेब महाराजांच्या मृत्यूची बातमी ऐकून म्हणाला, ''ज्याला मी गेली ३५ वर्षे जिंकू शकलो नाही, तो सिवा अतिशय मोठा, शूर, कल्पक योद्धा होता!''

शिवाजीमहाराजांच्या कर्तृत्वाने आपले डोळे दिपून जातात. पण




*प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. चित्रलेखा पुरंदरे – 'शिवजयंतीचा सोहळा हा खऱ्या अर्थाने येथे साजरा होताना मला दिसतो आहे!'*

आपण डोळे उघडून पाहायला हवे. महाराजांच्या राज्यकारभाराचे, चारित्र्याचे, राष्ट्र उभारणीसाठी केलेल्या भगीरथ प्रयत्नांचे अनुकरण व्हायला हवे.

वि. का. राजवाडे, सेतू माधवराव पगडी, मेहेंदळे, खरेशास्त्री अशा इतिहासकारांनी वणवण भटकून पुरावे गोळा केले आहेत. आपण जे शिवचरित्र वाचतो त्यातले ऐंशी टक्के चरित्र परकीयांनी लिहिलेले आहे. निकोलाय मनुची याने महाराजांचे चरित्र लिहिले आहे. १६७० साली एका पोर्तुगिजाने त्यांचे चरित्र छापून प्रसिद्ध केले आहे. इंग्रज आणि इतरही वकिलांनी बारीकसारीक वर्णने लिहून ठेवली आहेत. हा राजा उठतो कसा, बसतो कसा, रागावतो कसा, हसतो कसा हे सारे त्यांनी नोंदवले आहे! हेन्री ऑक्झिंडननेही लिहून ठेवले आहे. हेन्री ऑक्झिंडनवरून मला एक गोष्ट आठवली. त्यावरून महाराजांच्या स्वभावाची, राज्यावरील निष्ठेची, आपल्या राज्यातील कारागिरांवर असलेल्या विश्वासाची आणि परकीयांची पारख त्यांना कशी होती याची कल्पना येते.

दि. ६ जून १६७४ रोजी रायगडावर महाराजांचा राज्याभिषेक होणार होता. त्यासाठी दि. १० मे १६७४ या दिवशी हेन्री ऑक्झिंडन रायगडला येण्यासाठी निघाला. १३ मेला तो चौल येथे पोहोचला. चौल हे पोर्तुगिजांचे ठाणे होते. त्यांच्या किल्ल्याचे सर्व दरवाजे बंद केलेले त्याला दिसले. आत गेल्यावर त्याने तेथील मुख्य अधिकाऱ्याला विचारले की दरवाजे बंद का करून ठेवलेले आहेत? तेव्हा त्या अधिकाऱ्याने उत्तर दिले की तो भयंकर शिवाजी केव्हा धाड घालील हे सांगता येत नाही. त्याची आम्हाला फार भीती वाटते!

दि. १९ मे १६७४ रोजी हेन्री रायगडावर पोहोचला. तेथे राज्याभिषेकाची तयारी सुरू होती. या सोहळ्यापेक्षा हेन्रीचे लक्ष व्यापार, अर्थकारण, राजकारण याकडेच अधिक होते. शक्य तेथे आपले घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न तो करत होता. राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांनी नवी नाणी पाडण्याची आज्ञा केली होती. ती नाणी 'शिवराई' फारशी सुबक नव्हती. इंग्रजांनी पाडलेली नाणी सुबक, खणखणीत आवाज करणारी होती. हेन्रीने आपली नाणी आणि शिवराई ही दोन्ही रामचंद्रपंत अमात्यांना दाखवून त्यांना सांगितले की तुमची नाणी पाडण्याचे काम आमच्याकडे द्या. आमच्या नाण्यांसारखी सुंदर नाणी आम्ही पाडून देऊ. मात्र त्या बदल्यात आमची नाणीही तुमच्या राज्यात चलनात यावीत. त्यावर अमात्य त्यांना शिवाजीमहाराजांकडे घेऊन गेले. दोन्ही नाणी न्याहाळून, टोपीकरांचे म्हणणे ऐकून महाराज म्हणाले, 'आमच्या राज्यातले सोनार कुशल कारागीर होतील तेव्हा याहून सुंदर नाणी पाडतील! आम्हाला तुमच्या मदतीची गरज नाही!' महाराजांचा सावधपणा हेन्रीच्या चांगलाच लक्षात आला! ''

यानंतर बाबासाहेब पुरंदरे यांची 'कोण तू रे कोण तू ?' ही कविता सादर करून सौ. चित्रलेखाताईंनी आपले भाषण समाप्त केले.

यानंतर समारंभाच्या अध्यक्षा सौ. धनश्रीताई लेले आपल्या अध्यक्षीय भाषणासाठी उभ्या राहिल्या. सद्गुरू स्तवन करून आणि व्यासपीठावर उपस्थित सन्माननीय व्यक्ती आणि श्रोतृवर्गाला अभिवादन करून सौ. धनश्रीताई लेले यांनी आपल्या व्याख्यानाला सुरुवात केली तीच डेरवण येथील स्थानाची महती वर्णन करीत! त्या म्हणाल्या, ''काय पवित्र भूमी आहे ही! ब्रह्मलीन वहाळकरबुवा, ब्रह्मलीन सीतारामबुवा वालावलकर, ब्रह्मलीन श्रीसहजानंद सरस्वती, भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली ही भूमी, येथील प्रसन्नता प्रत्येक पावलाला, प्रत्येक क्षणी, प्रत्येक कणाकणातून जाणवत आहे! स्फुल्लिंग चेतवणारी आणि आपला सुवर्णकाळ ज्यांनी स्वत्व शिंपून उभा केला त्या छत्रपती शिवाजीमहाराजांची ही शिवसृष्टी, भूतकाळ कसा होता आणि भविष्यकाळ कसा असायला हवा याचे मार्गदर्शन करणारी ही शिवसृष्टी, म्हणजे आध्यात्मिक अधिष्ठानावर उभारलेले हे शिवस्थान, एवढेच नव्हे तर 'बहुत जनांसी आधारू' हे लक्षात ठेऊन येथे चालणारे विविध सामाजिक उपक्रम हे सगळे पाहून आम्ही थक्क झालो. येथे मला तीन धारा दिसत आहेत. त्रिवेणी संगम होताना दिसतो आहे! अध्यात्म, इतिहास आणि समाज ही तीन प्रतले एकमेकात अगदी सहजपणे मिसळलेली मी अनुभवते आहे! एवढेच नव्हे तर या तीन प्रतलांमध्ये मला गीतेतील तीन योग मिळालेले मला दिसताहेत! गीतेमध्ये भगवंतांनी ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग सांगितले आहेत. या तीन प्रतलात ते तीन योग येऊन मिळाले आहेत असे मला काल या भूमीत पाऊल टाकल्यापासून सातत्याने जाणवते आहे!

काय सांगतो ज्ञान योग? 'सोऽहं' हे ज्ञानयोगाचे छोट्यातले छोटे रूप. तो म्हणजे मी, मी म्हणजे तो, आमच्यात भेद नाही! ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'या उपाधिमाजी गुप्त । चैतन्य असे सर्वत्र ।।' आपण वरकरणी वेगळे असलो तरी आपल्या अंत:करणातील सारभूत असे चैतन्य मात्र एकच आहे. या जगातील प्रत्येक जण माझाच आहे. 'सद्गुरू सोयरा' काल मी वाचायला घेतले. त्याच्या मुखपृष्ठापासून सुरुवात केली ती 'धावा' झाल्यावरच मी थांबले! त्याच्यामध्ये जी माया आहे, आपलेपणा आहे, आपल्याकडे खेचून घेण्याची जी ताकद आहे, ती त्या छापील शब्दातूनही प्रत्ययाला येते. कारण हे सगळे माझे आहेत! हा आपलेपणा म्हणजे ज्ञानयोगाचे पुढचे रूपच आहे! ज्ञानेश्वरमहाराज म्हणाले 'हे विश्वची माझे घर ।' आपल्याकडे आपल्या घरातीलच कोणकोण माझे आहेत यावर चर्चा चालते. आणि ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'हे विश्वची माझे घर ।' हे पुस्तक वाचत असताना क्षणोक्षणी याचा प्रत्यय येत होता.

काल कोणीतरी मला सांगितले की काकामहाराजांकडे येणाऱ्या प्रत्येकाला ते ओळखतात. ही केवढी मोठी गोष्ट आहे! एवढ्या मोठ्या समुदायातील प्रत्येकाला ओळखणे ही साधी गोष्ट नाही. येणाऱ्या प्रत्येकाकडे त्यांचे लक्ष आहे. 'हे माझे आहेत' या भावनेतूनच हे येते. त्यातूनच हे कार्य उभे राहिले आहे. ज्ञानयोगाला आपल्याकडे अतिशय सुंदर शब्द वापरला आहे – सामरस्य! आपण समरस आहोत याची जाणीव म्हणजे सामरस्य! त्या पुस्तकातील सर्वच रेखाचित्रे फार सुंदर आहेत. त्यातील एक चित्र फारच गोड आहे. दिगंबरदासमहाराज बसले आहेत आणि त्यांच्या अंगावर चिमण्या बागडत आहेत! हे कधी घडू शकते? ज्ञानयोग ही निर्भयता देतो. माझ्यापासून वेगळा कोणीच नाही. मग मला कोणापासून भ्यायची गरजच काय? आणि ही निर्भयता एखाद्या व्यक्तीच्या अंत:करणात असते तेव्हा तो तर निर्भय असतोच पण त्याच्याजवळ येणारा प्रत्येक जण त्याच्यासाठी निर्भयच होऊन येतो. 'मार्तंड जे तापहीन ।' चिमणी असा पक्षी आहे की दूरून चाहूल लागली तरी उडून जातो. पण महाराजांच्या अंगाखांद्यावर त्या बसतात, कारण त्यांना पूर्ण खात्री आहे की येथे आपल्याला आश्रयच मिळणार आहे. येथून हाकलले जाणार नाही! प्रेमाने अंगाखांद्यावर वागवले जाणार आहे. हा ज्ञानयोगाचा प्रत्यक्ष पुरावा आहे. मंडालेमध्ये टिळकांच्या अंगावर चिमण्या खेळायच्या असे उल्लेख आहेत. टिळकसुद्धा त्याच पातळीवरचे होते. आपण त्यांना फक्त राजकारणी मानले.

एकदा बनारसला टिळकांबरोबर महाराष्ट्रातील बरीच मंडळी गेली होती. सकाळी ती सर्व मंडळी स्नाने वगैरे करून लगबगीने बाहेर जायला निघाली. टिळकांनी विचारले, 'कोठे निघालात?' त्यांनी सांगितले की बनारसमध्ये एक मोठे ज्ञानयोगी संन्यासी आहेत, त्यांना भेटायला चाललोय!' टिळक हळुवारपणे म्हणाले, 'येथे भेटला नाही का तुम्हाला?' ज्ञानयोग म्हणजे निर्भयता, सामरस्य, आणि ते मला या भूमीत दिसते आहे!

ज्ञानयोग छत्रपती शिवाजीमहाराजांच्यामध्येही आपणाला दिसतो. सामरस्य नसते तर एवढा मोठा उपक्रम त्यांनी हाती घेतला नसता. त्यांच्यावेळचे अनेक जण आपापली वतने घेऊन बसले होते पण छत्रपती शिवाजीमहाराजांना वाटले की हे लोक माझे आहेत. ही भूमी माझी आहे. या भूमीतील प्रत्येक माणसाचे दु:ख माझे आहे. आणि इतर कोणी केला नाही तरी मला उठाव केला पाहिजे! इतिहासामध्येसुद्धा ज्ञानयोग डोकावतो!

समाजामध्येसुद्धा ज्ञानयोगाशिवाय काही घडत नाही. कोणतेही कर्म करायचे तर आधी ज्ञान संपादन करावे लागते. ही सर्व डॉक्टरमंडळी येथे काम करताहेत तो ज्ञानयोग नाही का? येथे फक्त हॉस्पिटल चालवीत नाहीत तर प्रत्येक काम 'रिसर्च ओरिएंटेड' आहे, प्रत्येकाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न आहे. शोध घेण्याची वृत्ती येथे जाणवते आहे! आणि केवळ शोध घेऊन न थांबता त्याचा उपयोग समाजाला कसा होईल या दृष्टीने प्रत्येक मॉडेल तयार केले जात आहे! हे ज्ञानयोगातून आलेले सामरस्य आहे!

डॉ. सुवर्णाताई काल सांगत होत्या की अगदी सुरुवातीला पेशंट येत नव्हते. तेव्हा महाराजांनी सांगितले की ते जर येत नसतील तर तुम्ही त्यांच्या दारापर्यंत जा! हे केवळ घडू शकते ते सामरस्यातूनच! हे सामरस्य अध्यात्मात दिसते, छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासात दिसते आणि समाजातही पाहायला मिळते. त्यामुळे येथे अध्यात्म, इतिहास आणि समाज यांच्या जोडीने मला येथे ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग दिसतोय!

कोणालाही म्हणावे की केवढे हो तुमचे हे काम आहे! तर सगळे म्हणतात, 'हे आमचे नाही, महाराजांचे काम आहे!' ही तर त्याच्याही वर कडी करणारी वृत्ती आहे. आज समाजात काय दिसते? कोनशिला कोणाच्या नावाने घालायची या वादात पुलाचे उद्‌घाटन काम रखडलेले आहे. हल्ली नाव हा महत्त्वाचा मुद्दा झाला आहे. नऊ हजार ओव्या लिहून ज्ञानेश्वर माउली 'हे माझे आहे' असे कुठे म्हणत नाहीत! 'सायिखडेयाचें बाहुलें । चालवित्या सूत्राचेनि चाले । तैसा मातें दावीत बोले । स्वामी तो माझा ।।' ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'मी कठपुतळी बाहुले आहे. मी कशी उडी मारायची हे मी ठरवत नाही! तो वर बसलेला सूत्रधार ते ठरवतो. समोर बसलेले निवृत्तीनाथ मला शब्द पुरवितात. मी फक्त माध्यम आहे.' याचा प्रत्यय काल आम्हाला जागोजाग येत होता. आम्ही क्रीडासंकुल पाहायला गेलो. जागोजागी जल्लोष, उत्साह, ऊर्जा, उमेद, उरक – खरोखरी 'उकारा'चे बिल्वपत्र घेऊन तेथे प्रत्येक जण वावरत होता असे मला वाटले. पराडकरसरांना म्हटले की कमाल आहे तुमच्या टीमची! तर ते म्हणाले, 'आमची नाही !' मग हे


अध्यक्षीय भाषण – मा. धनश्रीताई लेले

कोणाचे आहे? किती आश्चर्याची गोष्ट आहे की कोणीच श्रेय घेत नाही. आम्ही व्हॉट्सॲपवर चार ओळींचा मेसेज पाठविला तर पुढे लिहितो की माझ्या नावासह पुढे पाठवायला हरकत नाही! आजच्या काळात जेथे नावाला एवढे महत्त्व आलेले आहे, तेथे येथील प्रत्येक जण म्हणतो की हे माझे नाही, हा ज्ञानयोगाचाच पुरावा आहे! मी ओवी वाङ्‌मयावर अभ्यासासाठी एकदा दिंडीला गेले होते. पायी चालण्यासाठी तर गेलेच, पण या बायका गुणगुणतात ते ऐकायला गेले. एक आजी इतके छान काहीकाही म्हणत होत्या! मी त्यांना म्हटले, 'काय सुंदर रचता हो तुम्ही!' त्या म्हणाल्या, 'आम्ही रचत नाही, आम्हाला सुचते!' रचणे आणि सुचणे, एका अक्षराचा फरक! पण ते अक्षर बदलले की कर्ता बदलतो. मी रचले, याच्यात 'मी' येतो. मला सुचले यात दुसरा कोणीतरी सुचवतो! कालपासून मी येथे हे अनुभवत आहे!

माणसाने बासरीसारखे असावे असे म्हणतात. बासरी कशी असते? 'कहेलवाता है तू, बस वही कहे सकती । अपने मनकी कहू इतनी मेरी औकात नही ।' असा एक उर्दू शेर आहे. एकदा सगळ्या गोपी बासरीवर चिडल्या. आम्ही एवढं प्रेम करतो कृष्णावर पण तो बासरीला सारखी जवळ ठेवतो! 'बन्सी नाग नटी, तिला कटीतटी खोवोनी पोटीपटी' कुठे कुठे बासरीला ठेवलेय हे वामन पंडितांनी सांगितले आहे. हातात, पोटावर बांधलेल्या वस्त्रात, नाहीतर डोक्यावर खोचली आहे. पण कृष्णाच्या सगळ्यात जवळ बासरी आहे. बासरी गोपींना म्हणाली, 'कृष्ण माझ्याजवळ आहे, याची तीन कारणे आहेत. एक, मी आतून सरळ आहे. माझ्यावर कोठेही गाठ नाही. दोन, माझ्यावर छिद्रे आहेत पण मी छिद्रान्वेषी नाही. लोकांची छिद्रे न पाहता, मी माझ्या छिद्रातून मधूर ध्वनी काढते. आणि तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मी माझे काही बोलत नाही. तो बोलवील ते बोलते! 'माझे नाही' असे म्हटले की कार्य किती विस्तारते याचे सुंदर उदाहरण समोर आहे!

आता आपण कर्मयोगाकडे आलोत. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या कर्मयोगात हेच दिसते! ते असे म्हणाले नाहीत की हे राज्य मी स्थापले. ते म्हणाले, 'हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा!' मी केवळ माध्यम आहे. अकराव्या अध्यायात भगवान अर्जुनाला सांगतात –– 'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।' तू निमित्त म्हणून उभा रहा. छत्रपती शिवाजीमहाराज असे कुठेही म्हणत नाहीत की हे मी केले. कारण त्यांना जाणीव आहे आणि ती जाणीव त्यांना जिजाऊ आईसाहेबांनी करून दिली आहे. गीतेत सांगितले आहे की कर्मबंध तोडायचा असेल तर मीपणाचे टोक कापावे लागते!

आणि आजचा तिसरा मुद्दा – समाज. तेथे मीपणा चालतच नाही कारण समाज अनेक 'मीं'चा बनलेला असतो. तेथे एकटा मी कधीच उरत नाही. तेथेही हे 'मी'चे टोक कापून टाकावे लागते. जाता जाता आठवली म्हणून विवेकानंदांची एक गोष्ट सांगते. विवेकानंद अमेरिकेत गेले असताना अमेरिकेतील सर्वात धनाढ्य गृहस्थ, रॉकफेलर, त्यांना भेटायला आले. त्यांच्या देहबोलीतून 'मी' ठळकपणे जाणवत होता. त्यांची अपेक्षा होती की स्वामी उठून त्यांचे स्वागत करतील. पण स्वामी मेजाजवळ काहीतरी लिहीत बसले होते. त्यांनी फक्त मागे वळून पाहिले. रॉकफेलरनी आपली ओळख सांगितली की मी या देशातील सर्वात श्रीमंत माणूस ... वगैरे वगैरे. स्वामी म्हणाले, 'सो व्हॉट?' त्यांनी आपल्या ऐश्वर्याचे आणखी वर्णन केले. स्वामी पुन्हा म्हणाले, 'सो व्हॉट?' स्वामी आपल्याकडे लक्षच देत नाहीत हे कळल्यावर त्याला कळले की आपले काहीतरी चुकते आहे! अर्थात आजच्या काळात एवढे कळण्याएवढे मन जागृत होते हेही महत्त्वाचे आहे! जेव्हा मग त्यांनी स्वामींना बोध करण्याची विनंती केली तेव्हा स्वामी त्यांना म्हणाले की ही तुमच्याकडील संपत्ती तुमची नाही. ज्यांना गरज आहे त्यांना ती वाटण्यासाठी देवाने तुम्हाला निवडले आहे. सत्पुरुषांच्या सांगण्याचा प्रभाव पडतो. पुढच्या काही दिवसातच 'रॉकफेलर फाउंडेशन' सुरू झाले. त्यांनी एवढ्या लोकांना मदत केली की 'गौरवं प्राप्यतेदानात् ।' रॉकफेलर यांच्यावर गौरवपर रकाने वर्तमानपत्रात लिहून आले. ते भेंडोळे घेऊन महाशय पुन्हा विवेकानंदांकडे आले. स्वामी बहुधा तेव्हाही पुन्हा म्हणाले असतील, 'सो व्हॉट?'

माणूस म्हणून जन्माला आल्यावर माध्यमाचे काम करण्यासाठी तू मोकळाच राहिला पाहिजेस. त्यासाठी 'मी'चे एक टोक कापले की एक कर्मबंध तुटतो आणि कर्मबंधाचे दुसरे टोक असते 'फलाशा'! 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ।।' ही कर्मबंधाची चतुःसूत्री आहे. त्यातही हेच

सांगितले आहे, पहिला 'मी'चा बंध आणि दुसरा फलाशेचा बंध!... मला काय मिळणार !

ही भूमी घडविताना खूप विरोध झाला. हे घडविणेही कठीण होते. पण घडविताना महाराजांनी असा विचार केला नाही की मला काय मिळणार! इतिहासात, छत्रपती शिवाजीराजांनी कधी विचार केला का की मला काय मिळणार? दिवस रात्र सतत मोहिमा! मला काय मिळणार हा प्रश्न त्यांना पडला नाही. समाजजीवनात वावरताना तो प्रश्न त्याज्यच असतो कारण तेथे काही मिळत नाही द्यावेच लागते. सावरकरांची कविता आहे 'माझे मृत्युपत्र'! त्यात ते म्हणतात – 'त्वत्स्थंडिलीं ढकलिली गृहवित्तमत्ता । दावानलात वहिनी नवपुत्रकान्ता ।। त्वत्स्थंडिलीं अतुल–धैर्य वरिष्ठ बंधू । केला हवी परम कारुण पुण्यसिंधू ।। त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला । त्वत्स्थंडिलीं बघ अता मम देह ठेला ।।' सावरकर म्हणतात – राष्ट्र आमचे आहे. त्यावर बसून कोणीतरी मला गुलाम म्हणून वागवताहेत हे चालणार नाही! त्यासाठी हा यज्ञ सुरू झालेला आहे. त्यात माझे घर, संपत्ती, मत्ता सगळे सोडले. या यज्ञाच्या वणव्यात माझी वहिनी, माझी पत्नी आणि नुकताच जन्मलेला प्रभाकर हा माझा मुलगाही सापडला आहे. माझा धाकटा बंधूही त्या यज्ञकुंडात बळी गेला आहे आणि मी माझाही देह आता ठेवीत आहे. संपूर्ण सावरकर कुटुंब यज्ञवेदीवर उभे आहे. पण यातून मला काय मिळेल असा विचार त्यांच्या मनात आलेला नाही. आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही त्यांना काहीच मिळालेले नाही. केवळ खूप अपमानच झाला. हा कर्मयोगच आहे. त्यांची एक पंक्ती मला फार आवडते. ''हे मातृभूमी! तुजला मन वाहियेलें । वक्तृत्व वग्विभवही तुज अर्पियेलें ।''

पहिल्याने, मी तुला माझे मन अर्पण केले आहे. क्रिया या मनानेच होतात. देहाने नाही. म्हणून दहावीतली मुलं आपणाला जेव्हा नमस्कार करायला येतात तेव्हा आपण सांगतो की मन लावून पेपर लिही. खरं तर 'पेन' लावून पेपर लिही असे म्हणायला हवे. पण मन चालले तरच पेन चालते. योगवासिष्ठात वसिष्ठ मुनी रामाला सांगतात की कार्य हे देहाने नव्हे तर मनानेच होत असते. ते म्हणतात क्रिया ह्या मनानेच होत असतात, देहाने नव्हे! 'मनसेव कृतं कर्म न शरीरेण कृतं कृतं । येनैवालिंगिता कांता तेनैवालिंगिता सुता ।' मुलीला जवळ घेणे आणि पत्नीला जवळ घेणे यातील क्रिया एकच असली तरी मन मात्र वेगळे आहे.

त्यामुळे क्रिया या मनाने होत असतात, देहाने नव्हे, म्हणून प्रथम मन द्यावे लागते! मला असे वाटते की महाराजांनी हे स्थित्यंतर घडवून आणत असताना सर्वांना सांगितले असावे की प्रथम सर्वांनी मन द्यायला पाहिजे. फलाशा सोडून दिली जाते तेव्हाच त्या मनाचे सारतत्त्व प्रत्ययाला येते. 'मी' चा आणि फलाशेचा बंध तोडणे हा कर्मयोग मला येथे कालपासून दिसतोय, तीनही ठिकाणी– अध्यात्म, इतिहास आणि समाज! ही मंडळी काम करतात तेव्हा ते 'टिकमार्क' साठी नसते तर त्याला भक्तीचे अस्तर असते! ते कोरडे नसते तर ओले असते. दक्षिणा देताना नाणे पाण्यात भिजवून देतात. ते आपल्या मनाच्या ओलेपणाचे प्रतिक आहे. विनोबांनी एक उदाहरण दिले होते. ते म्हणाले माझ्यासमोर दोन कागद आहेत. दोन्ही सारख्या प्रतीचेच आहेत मात्र येणारे लोक त्यातील एकच कागद उचलतात कारण त्यावर रिझर्व बॅन्केचा दोन हजाराचा शिक्का आहे! विनोबा सांगतात नुसते कर्म करून चालत नाही. जोपर्यंत त्यावर भक्तीचा शिक्का पडत नाही तोपर्यंत त्याचे वजन वाढत नाही! येथे खेळ सुरू आहेत. आठ हजार तर खेळाडूच आहेत. त्यांचे कौतुक पाहायला पालक तर येणारच! हे बोलायला ठीक आहे. पण त्यांच्या निवासाची व्यवस्था? भोजनाची व्यवस्था? हे सगळे सोपे नाही. पण एकाही स्वयंसेवकाच्या चेहऱ्यावर आठी दिसली नाही! चिडचिड नाही! भाषेमध्ये औद्धत्य नाही! हा आजच्या काळातील भक्तियोगच आहे.

तोच भक्तियोग छत्रपती शिवाजीमहाराजांच्या कार्याला लावून पहा. ते असे नाही म्हणाले की ही माझी भूमी आहे! ते म्हणाले ही आपली भूमी आहे! आणि त्या भूमीवर त्यांची निष्ठा आहे. वंदे मातरम् म्हटल्यावर आपल्या डोळ्यासमोर भारतमाताच उभी राहते कारण आम्ही तिला आमच्या आईचे स्थान दिले आहे. हे प्रेम आहे. ही भक्ती आहे! महाराजांनी जे केलं ते सात्त्विकतेच्या अधिष्ठानावर भक्तीचे सिंहासन त्यांनी उभे केले! भक्ती अध्यात्मात असते तेव्हा ती श्रद्धा असते. भक्ती जेव्हा इतिहासात येते तेव्हा तिचे नाव निष्ठा होते! आणि भक्ती समाजात जाते तेव्हा तिचे नाव प्रेम होते! अध्यात्मातील मंडळी म्हणतात की आमची महाराजांवर श्रद्धा आहे. स्वामींच्या तसबिरीवर असते ना, 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे!' या वाक्याची मला लहानपणी गंमत वाटायची. वाटायचे, हे मागेच? आता कळते की कोणीतरी मागे असेल तरच एक पाऊल पुढे पडते! अध्यात्मामध्ये भक्ती श्रद्धेची पैठणी नेसून येते. पैठणीसारखी ती लखलखीत असते!

शंकराचार्य धर्माच्या उत्थानासाठी शिष्यांसमवेत भारत भ्रमण करीत होते. भ्रमण करताना ते एका गावात आले. तुफान पाऊस पडत होता आणि मधली नदी दुथडी भरून वाहत होती. शंकराचार्यांनी आपल्या दोन शिष्यांना नदीपलीकडच्या गावात धर्मप्रसारार्थ पाठविले आणि त्यांना चार दिवसांनी पुन्हा परत येण्यास सांगितले. चार दिवसांनी पाणी ओसरेल अशी अपेक्षा होती. पण पाणी कमी झाले नव्हते. ते दोन्ही शिष्य ठरल्याप्रमाणे पलीकडच्या तीरावर आले. या तीरावर शंकराचार्य उभे होते. पाणी पाहून एकाला वाटले की ते आपल्याला पलीकडे बोलावणार नाहीत. पण त्यांनी दोघांना आपल्याकडे

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

बोलावले. तेव्हा त्याने उडी मारलीच नाही. मात्र दुसऱ्याने पाण्यात उडी घेतली. पुराच्या पाण्यात पोहणे अवघड असते. तरीही त्याने अर्धे पात्र पार केले आणि त्याचा आत्मविश्वास गेला. शक्ती संपल्यासारखे त्याला वाटले आणि तेथूनच आपल्या गुरूंना हात जोडून तो म्हणाला की मला माफ करा. मी आपली आज्ञा पूर्ण करू शकलो नाही. शंकराचार्यांना काय ते समजले आणि त्यांनी एक कमळाचे पान त्याच्याकडे भिरकावले. त्याने ते पकडले आणि हे आपल्या गुरूंनी टाकलेले पान आहे, ते मला पलीकडे सुखरूप नेल्याशिवाय राहणार नाही या विश्वासाने तो नदी पोहून आला!

कोन बदलला की भक्तीचे नाव बदलते. अध्यात्मात ती श्रद्धा होते. इतिहासात ती निष्ठा होते. निष्ठा म्हटल्यावर आपणाला छत्रपती शिवाजीमहाराज दिसतात, टिळक दिसतात, सावरकर दिसतात. विवेकानंदांनी सांगितले आहे की सर्वांबद्दल मनात प्रेम बाळगा पण इथल्या भूमीबद्दल निष्ठा ही असलीच पाहिजे! भरण पोषण या भूमीत आणि निष्ठा तिकडे असे नाही चालणार! हे १८९७ मध्ये विवेकानंद म्हणून गेले आहेत! आणि भक्ती समाजात आली की तिचे नाव प्रेम!

कबीर, तुकाराम, रामदासस्वामी हे सगळे चूक दिसली की काठी उगारायला तयारच आहेत. ज्ञानेश्वर माउलींची भाषा कशी गोड आहे! कबीरांची भाषा का गोड नाही? रामदासस्वामी आपल्याला का जराही मोकळे सोडत नाहीत? कारण, काळ बदलला आहे! साडेतीनशे-चारशे वर्षे मध्ये गेली आहेत. परकीयांचे आक्रमण झाले आहे. आता गोडगोड बोलून भागणार नाही. आता काठीच उगारायला हवी. पण ही मंडळीही दुसऱ्यावर प्रेम करायला सांगतात. कबीर सांगतात की दुसऱ्यावर एवढे प्रेम करा की त्याच्या पायात काटा बोचला तर आपल्या डोळ्यात अश्रू आले पाहिजेत. एवढे प्रेम समाजात असेल तेव्हा समाजाचे विघटन करायला कोणी धजावणार नाही. इंग्रजानी 'डिव्हाइड ॲन्ड रुल' या तत्त्वाने राज्य केले. आता तर आपलीच माणसे चौकटी पाडा आणि राज्य करा असे म्हणू लागली आहेत! म्हणून 'आम्ही फुटणार नाही' असे आपणच म्हटले पाहिजे. हे समाजावरचे, देशावरचे प्रेम आहे. हा भक्तियोग आहे! तो भक्तियोग मला इथल्या अध्यात्मात, इतिहासात आणि समाजासाठी चाललेल्या कामातही दिसतोय! चित्रलेखाताई म्हणाल्याप्रमाणे कार्य सुरू करणे सोपे असते पण ते सातत्याने चालविणे, त्याचा विस्तार करणे कठीण असते. त्यासाठी गीतेत सातत्य योग, अभ्यास योग सांगितला आहे. तोही येथे आहे. त्यामुळे गीता कशी जगावी असे कोणी मला विचारले तर मी सांगेन की येथे येऊन बघा! गीता हे वाचण्याचे पुस्तक नाही, जगण्याचे पुस्तक आहे. नामदेवमहाराज म्हणतात 'एक तरी ओवी अनुभवावी ।' आणि याचा अनुभव घ्यायचा असेल तर येथे मुक्काम करावा.

काल या सगळ्याचा विचार करताना मला ज्ञानेश्वरांची ती ओवी आठवली - 'त्या सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसुमांची वीरा । पूजा करीता होय अपारा । तोषालागी ।।' ही ओवी आठवली. या तीन चरणामध्ये तीन योग आहेत. 'त्या सर्वात्मका ईश्वरा ।' केवळ ईश्वराची नव्हे तर प्रत्येकाच्या अंतरंगात असलेल्या ईश्वराची - म्हणजे ज्ञानयोग! 'स्वकर्म कुसुमांची वीरा' - आपल्या कर्मकुसुमांनी करावी! कर्मयोग! काय करावी? पूजा! 'करीता होय अपारा ।' भक्ती योग! कशासाठी? 'तोषालागी' ! आणि तो आनंद मला येथे मिळाला.

हल्ली आनंद मिळाला असे म्हणणाऱ्या माणसाकडे संशयाने पाहिले जाते. 'पु. ल.' म्हणतात आपल्या आनंदाचा सूर कधीच पक्का लागत नाही मात्र तक्रारीचा सूर नेहमीच पक्का असतो. गेले दोन दिवस हा निर्भेळ आनंद आम्ही येथे लुटतो आहोत, तुम्ही येथे ही जी कर्मकुसुमांची पूजा बांधली आहे त्यात माझे एक कुसुम अर्पण करण्याची संधी मला आपण दिलीत, येथे येऊन महाराजांचे आशीर्वाद मला मिळाले हे माझे भाग्य आहे. मला पांडुरंगशास्त्री आठवल्यांचे वचन पुन:पुन्हा आठवतेय - 'किये बीना कुछ होता नही । किया हुवा व्यर्थ जाता नही । काम करनेकी शक्ती मुझमें है । काम करता जा । पुकारता जा । मदद तैयार है ।'

अध्यक्षीय भाषणानंतर, आभारप्रदर्शन आणि वरयाचना पठण होऊन सभेचा कार्यक्रम समाप्त झाला.

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०